॥श्री॥

३.८.२०.
मुंबई.

मा. संपादक 'सॉनिक ऑक्टेव्हज' यांस,

स. न. वि. वि.

आपण केलेल्या आवाहनास प्रतिसाद म्हणून माझी 'ग्रह-निग्रह' ही कथा स्पर्धेसाठी पाठवत आहे. ही लघुकथा मी स्वतः लिहिलेली असून माझी स्वतःची निर्मिती आहे. ती २५०० शब्द ह्या मर्यादेत बसणारी आहे. तरी तिचा स्पर्धेत समावेश करावा.

आपली नम्र,
सौ. शुभा प्र. नाईक.

संपर्कासाठी पत्ता:-
सौ. शुभा प्र. नाईक,
प्लॉट नं. ११६, 'सत्कार अपार्टमेंट्स'
फ्लॅट नं. ६०३, कलेक्टर्स कॉलनी,
चेंबूर, मुं. ४०००७४.
भ्रमणध्वनी:- ९८२०३९०९४९.

# ग्रह-निग्रह

लेखिका- सौ. शुभा नाईक

स्मिता 'मनोमीलन'च्या ऑफिसमधून बाहेर पडली तेव्हा बारा वाजून गेले होते. 'मनोमीलन'च्या कार्यालयात पुढच्या सहा महिन्यांची फी भरायला ती गेली होती. — आपल्या लेकीसाठी — श्रेयासाठी. 'पॉश' ऑफीस, नोंदणी करणाऱ्या मेंबर्सशी गुळगुळीत शिष्टाचार पाळून सफाईने वागणारा, बोलणारा स्टाफ. सगळं मुलायम अन् आदबशीर. अगदी तत्परतेने सर्व माहिती पुरवणारा स्टाफ. सगळंच 'ऑनलाईन' होतंय् अलीकडे. घरबसल्या मिळणारी, आपल्या अपेक्षांमध्ये बसणारी स्थळं! — पण तरीही काहीही न मिळाल्याची रुखरुख केवळ पत्रिका जुळत नाहीत म्हणून — तिचं मन खंतावतं. 'एनी हेल्प मॅडम?' ती विचारात गढलेली बघून एकजण तत्परतेने विचारते. 'न-नो-नाही- मी फक्त तुमची पुढच्या सहा महिन्यांची फी भरायला आले होते. ह्या महिन्यात संपल्येय् ना फी म्हणून..' — स्मिता ओशाळवाणं हसत खुर्चीतून उठते 'भरलं ताट समोर यावं, पण जेवता येऊ नये असं झालंय ह्या कुंडली जमण्याच्या गोंधळात — त्यानेच श्रेयाच्या लग्नाला उशीर होतोय...."

तिच्या गळ्यात आवंढा येतो.

ती लिफ्टने खाली उतरते. दुपारची भगभगीत उन्हं तिला असह्य होतायत. रिक्षाला थांबवून ती आत बसते. "आता पुढचे सहा महिने बघायला नको... मिळत राहातील श्रेयाच्या लॅपटॉपवर स्थळं. फक्त पत्रिका जुळायला हव्यात.." ती उसासा टाकत पुटपुटते. ऑटोत बसल्या-बसल्या ती वैद्यगुरुजींना फोन लावते; त्यांना आता ह्या ~~सात~~ आधीच्या स्थळाविषयी विचारायचंय् तिला. बाकीच्या स्थळांवर फुली मारलीय् गुरुजींनी. "हे एकच स्थळ आहे सध्या. — विचारू कधी वेळ आहे त्यांना' — ती फोन लावते. पण तिला कळतं की गुरुजी महिनाभरासाठी गावी चाललेत — उद्याच. गुरुजींकडे मोबाईल, लॅपटॉप यासारखी आधुनिक उपकरणं नाहीत. फोनही साधाच, स्मार्टफोन नाहीचं. गावी इंटरनेटचीही वानवा. स्मिता वैतागल्यासारखी झाली. वैद्यगुरुजींनी पूर्वीच्या सगळ्या स्थळांचे लावलेले 'निकाल' तिच्या डोळ्यासमोरून सरकले.

— गेली पाच वर्षं लेकीसाठी स्थळं बघत्येय् ती. सॉफ्टवेअर इंजिनियर मुलगी — मोठ्या हुद्द्यावर काम करणारी, हाताखाली काम करणाऱ्यांची टीम — पण पत्रिकेतले आडवे येणारे ग्रह. वैद्यगुरुजींनी पुन्हा-पुन्हा सांगून मनावर बिंबवलेली ती ग्रहस्थिती — नाकारलेली उत्तमोत्तम स्थळं — त्या विचारांनीच तिचं मन कोमेजतं. एकेका स्थळाविषयी मारलेले शेरे "अहो मॅडम, हे लग्न म्हणजे अनिष्टयोग. मुलीचा मृत्यूयोग ठरलेला

मग सांगितलेलं "त्याच्याशी लग्न झालं, तर दोन महिन्यात घटस्फोट. — गॅरंटीने सांगतो. काय समजले?" — स्मिता खचलेली, पण त्यावेळी त्यांच्या सखोल ज्ञानाच्या दर्शनाने दिपून गेलेली. "अहो, तिचे ग्रहयोग वाईटच. ह्या स्थळाशी सोयरिक जमली, तर मुलाकडच्यांना घातक." — वैद्यगुरुजींचा ~~आवाज~~ सानुनासिक आवाज आताही तिच्या कानात घुमतोय. प्रत्येक स्थळाला लावलेलं 'नन्नाचे पाढे'.

— स्मिताचा नवरा यात लक्ष घालत नाही. "अनिल, अरे लग्नाला आलेली मुलगी, लक्ष घाल की जरा वरसंशोधनात. जा त्या गुरुजींकडे कुंडल्या घेऊन कधीमधी." — "तेवढं मात्र सांगू नकोस हां" तो ताडकन तिरीमिरीत बोलतो. स्मिता हताशपणे उसासते. तिच्या सततच्या बोलण्याला विटून तो म्हणाला एकदा, "मग मी कशा प्रकारे मदत करू या मोहिमेत? मला अशा प्रकारे लग्न जमवण्याच्या पद्धतीत त इंटरेस्टच नाहीये. हां, जर तू श्रेयाला घेऊन एखाद्या मुलाला भेटायचं ~~चंग~~ म्हणत असशील तर गोष्ट वेगळी. आय ॲम रेडी. पण तिथपर्यंत घोडं पोचतंय कुठे? ते पेंड खात मध्येच राह्यलंय उभं वर्षानुवर्षं — तो कुत्सितपणे हसून गॅलरीत जाऊन सिग्रेट ओढतो अशावेळी. त्याचं बोलणं तिच्या काळजात सलतं. पण त्यात तिचा तरी कुठेय दोष? लेकीचं वय वाढतंय, जिवाचा घोर वाढतोय. त्याला येणारी उद्विग्नता कळलेय तिला.

— तिला आठवतं, तिने लग्नाआधी नोकरी केली होती. ती नोकरी करणारीच होती. पण अनिलने अट घातली होती 'नोकरी करणारी मुलगी नको'. पर्मनंट असलेली नोकरी सोडून ती मुकाट्याने बोहोल्यावर चढलेली. तो काळच वेगळा होता. तिच्या मनात येतं, आज आपणच लेकींना पंख देतोय, उडायचं बळ देतोय, सक्षम करतोय. रिक्षा घराशेजारी थांबले. विचारा-विचारात कधी घर येतं तिला कळतच नाही.

— रिक्षाचं भाडं चुकतं करून ती बिल्डिंगच्या पायऱ्या चढायला लागते. ~~जुनी~~ साठ वर्षांची जुनी इमारत! लिफ्ट नसलेली; तीन मजल्यांची. तिच्या सासू-सासऱ्यांचाच फ्लॅट अनिलला मिळालाय. तिमजली इमारत, चढताना तिला धाप लागते. पंचावन्न पार केलेलं शरीर. तिच्या पायात पेटके आले. त्यातच वैद्यगुरुजी गावाला गेल्याचं कळलंय त्याने आलेला वैताग. म्हणजे दुसरा कोणी ज्योतिषी शोधणं आलं.... तिने पर्समधल्या चावीनं दार उघडलं. फ्लॅटच्या तीन किल्ल्या तिघांजवळ असतात. दार उघडून ती आत शिरली.

आत अनिल बसलेला. एकाग्रतेने सिग्रेट ओढत. त्या धुराने ती त्रासलेली. रिटायरमेंटनंतर त्यांचं सिग्रेट ओढणं वाढलेलं. "शी: काय रे हा धूर. ~~हे~~ रिकामपणीच हे असे चाळे सुचतात. म्हणून म्हणतेय की वरसंशोधनात लक्ष घाल जरा." अनिल शांतपणे, कुत्सित हसत म्हणाला "अगं मी सिग्रेटींचा धूर करतोय म्हणून रागावतेयस्, पण आतापर्यंत किती पैशांचा धूर केलास त्या ज्योतिषाला पत्रिका दाखवायला ते सांग ना." - तो तरातरा उठून तिच्याजवळ ~~येत~~ जात म्हणाला, "काय ग, एवढे उंबरठे झिजवतेयस त्या कागदावरचे तारे मोजणाऱ्यांसाठी पण एकाचीही पत्रिका ~~कशी~~ आपल्या श्रेयाच्या पत्रिकेशी कशी काय जुळत नाही बुवा? धाक दाखवून पैसे लुटायचे धंदे यांचे." तो लॅपटॉप उघडत म्हणतो.

— ~~ती~~ स्मिताला त्याचा त्रागा, उद्विग्नता नवीन नाहीय. "अरे, तिच्या पत्रिकेत योगच तसे आहेत, त्याला कोण काय करणार? कडक मंगळ, उशीरा विवाहयोग, अनिष्ट ग्रहस्थिती आहे. त्यांनी सांगितलं मला पहिल्याच भेटीत - जेव्हा मी श्रेयाची पत्रिका घेऊन गेले होते. "मॅडम, पत्रिका जमल्याशिवाय, बघितल्याशिवाय लग्न करू नका, नाहीतर घात ठरलेला." अरे, त्यांची काय कमांड आहे त्यांच्या विषयावर." तिच्या भक्तिभावाने ओथंबलेल्या चेहऱ्याकडे बघून अनिल निराशेने हसला - खांदे उडवून म्हणाला, "त्या चंद्रा~~वर~~-मंगळावर माणसांनी पाऊल ठेवलंय, अन् इथं ~~त्यांच्या~~ ~~ते~~ त्यांच्या तालावर माणसंच झुकतायत, वाकतायत." स्मिता आतून ताटं वाढून आणता-आणता म्हणाली, "त्या ग्रहताऱ्यांना हिणवू नका महाराज, त्यांचं जमलं म्हणून आपलं जमलं". - दोघे टेबलाशी बसून जेवता-जेवता गप्पा मारतायत. वैद्यगुरूजी महिनाभर गावी गेलेत, दुसरा ज्योतिषी शोधायला हवा, ~~याच~~ 'मनोमीलन'ची पुढच्या सहा महिन्यांसाठीची फी भरून झाली, ~~असं~~ इत्यादी ~~गोष्टी~~ गप्पा. आजपासून अनिलला घरबसल्या करायचं नवं काम मिळालंय. ऑनलाईन - करायचं काम. पैसाही बऱ्यापैकी मिळणार आहे. - मुख्य म्हणजे तो बिझी राहील. तिने सुटकेचा श्वास टाकला.

तिच्या मनात विचारांचं वादळ घोंघावतंय. अनिल म्हणतोय त्यात तथ्यही वाटतंय - पण तिचं पारंपरिक सनातनी मन माघार घेत नाहीय. पत्रिकेच्या जुळण्यावर ठाम विश्वास. प्रेमविवाह केला असता ~~श्रे~~ तर... मग काय? सब कुछ चलता है. ती खोलीत पडल्या-पडल्या 'व्हॉट्सअॅप' वरचे मेसेजेस, व्हिडिओज बघतेय. दुपार टळता-टळता श्रेयाचा मेसेज येतो - 'ऑफिसमध्ये थांबावं लागेल, यायला उशीर होईल. तुम्ही जेवून घ्या.' - मनातल्या चिंता दाबून ती वॉर्डरोब आवरतेय. श्रेयाचे

आठवडाभराचे धुवायला झालेले कपडे, सटरफटर गोष्टी. — बाहेर अनिलचं ही विचारचक्र सुरू. त्याच्या मनाविरुद्ध स्मिताने चालवलेला हा खटाटोप- त्याच्या मते हास्यास्पद. पण तिच्या मताशी असहमत असूनही तो तिच्या मतांचा आदर करतोय. विरोधातही आदर. त्याला हसू येतं. गेली पाच वर्षं कुंडलीशी झटापट कागदावरचे काल्पनिक संसार — फिस्कटणारे. तो विफलतेने हसतो. चांगली-चांगली उच्चभ्रू, उच्चशिक्षित स्थळं. श्रेयानेच तिच्या लॅपटॉपवरची त्याला दाखवलेली. 'मनोमीलन' तर्फे आलेली. आज वैद्यभटजी महिनाभर गावाला गेलेत हे ऐकून त्याला सुखद धक्का बसलाय पण स्मिता नवीन ज्योतिषाच्या शोधाला ~~आहे~~ लागलीय हे तिच्याचकडून ऐकून तो हताश झालाय. स्मिताला या विळख्यातून बाहेर कसं काढायचं ह्या विचाराने त्याला ग्रासलंय. श्रेयासारख्या गुणी मुलीचं लग्न अकारण लांबणीवर पडतंय. — त्या कागदी चौकटींनी घात केलाय माझ्या सोन्यासारख्या लेकीचा. मनातल्या मनात तो असंख्य वेळा हमसाहमशी रडलाय या त्रासाला कंटाळून. पण बापाचं काळीज कोणाला कळतं? आईची वणवण पत्रिका जमत नसल्यामुळे आलेलं खचलेपण तेवढं लोकांना दिसतं.

त्याने एकदा तिला चांगलंच फटकारलंय यावरून, "स्मिता आता पुरे झाला तो पत्रिका जमण्या-बिघडण्याचा खेळ. इतक्या वर्षांत एकदा तरी एखाद्यातरी मुलाला श्रेया भेटलीय कधी? नाही. कारण- गेली पाच वर्षं ~~हे~~ पत्रिका न जुळण्याचं हेच रडगाणं, तेच गुरुजी, तीच टेप लावून सांगतायत — अन् तू आंधळा विश्वास ठेवतेयस त्यांच्यावर. अगं, धाक दाखवून पैसे उकळण्याचे धंदे असतील कदाचित हे. त्यांचं आपल्या श्रेयाच्या लग्न जमणं-न जमण्याशी काय देणं-घेणं आहे गं? प्रत्येक वेळी पत्रिका बघण्याचे शे-दोनशे घेतातच ना ते? कशावरून ते हातचं गिऱ्हाईक जाऊ न देण्यासाठी असं करत नसतील?" — स्मिता त्याच्या बोलण्याने भयंकर डिवचली गेली. "काहीतरीच बोलू नकोस तू केवढा दांडगा अभ्यास आहे वैद्यगुरुजींचा. गेल्या वेळेस तर ते म्हणाले, "मॅडम, तुमच्या मुलीचं ग्रहमान इतकं वाईट आहे, की अजूनपर्यंत ती जगत्येय कशी याचंच नवल वाटतंय. मग पत्रिका न बघता लग्न जमवण्याची बातच सोडा." इतका ~~बारीक~~ सूक्ष्म अभ्यास आहे त्यांचा — कळलं? ~~स्मिता टीका~~ टीका करणं खूप सोपं आहे." अनिलने कपाळावर हात मारला. "एवढं 'रिॲक्ट' व्हायची गरज नाहीय् बरं का आता मला दुसरे गुरुजी बघावेच लागणार आहेत वैद्यगुरुजींच्या गैरहजेरीत." ती फणकाऱ्याने बोलून आत गेली होती.

रात्रीची जेवणं झाली. श्रेयाला उशीर होणारच होता.

ती साडेदहाला येते. ती जेवून आपल्या खोलीत झोपायला गेलीय्. पण ती
एवढ्या लवकर झोपणार नाही हे स्मिता-अनिल दोघांनाही ठाऊक आहे. आज
कालचे 'डिमांडिंग जॉब्ज' — तगडे पगार, पण तितकीच राबवणूक. स्मिता बिछान्या-
तच टक्क जागी. विचारांची अथक मालिका... अनिलच्या मतांचा विचार करत.
वरसंशोधनात नडणारे पत्रिकामेलन! अनिल त्या पत्रिकाजुळणी करणाऱ्यांना
'शास्त्रातले शुक्राचार्य' म्हणतो. 'त्यांना कशाला नावं ठेवतोस, आपण त्यांच्याकडे
जातो, ते काही आपल्याला बळजबरी करत नाहीयेत्.' — ती करवादून म्हणते.
—— बिछान्यावर पडल्या-पडल्या तिचं मन बत्तीस वर्षं माघारी जातं.
पत्रिका जमल्यासच पुढे जायचं हा 'वरसंशोधना' वेळी तिच्या आजोबांनी घातले-
ला 'पण'. अनिलकडून मात्र स्वच्छ शब्दांत 'आम्हाला पत्रिका बघण्यात इंटरेस्ट
नाही, तुम्हाला बघायची असल्यास बघा' असा स्पष्ट पवित्रा. एकतर्फीच पत्रिका
बघणं-जुळणं झालं.. अन नेमकं तेच ~~तिच्या~~ स्मिताच्या मनावर बिंबलं गेलंय.
म्हणूनच 'श्रेयाच्या बाबतीतही आपण तेच करतोय्, जे आपल्या बाबतीत
झालंय' — तिच्या मनात येतं. रात्री विचारांच्या उलघालीत कधी डोळा लागतो
तिला कळत नाही. शेजारी अनिल येऊन झोपल्याचंही तिला समजलं नाही.
सकाळी सगळं आवरून आठच्या ठोक्याला श्रेया ऑफिसला
निघालीय सुद्धा. "श्रेया, अगं आज अर्धा तास आधीच निघालीयस् तू."
स्मिता तिला टिफिन देता-देता ~~म्हणाली~~. आपली नाराजी व्यक्त करतेच.
"आई, अगं काल तुला म्हटलं नाही का मी, की टेन्सचा काहीतरी गोंध-
ळ आहे म्हणून. आजही परिस्थिती फारशी वेगळी नसणार आहे." श्रेया
उद्विग्न स्वरात पुटपुटली. दार लावून बाहेर जाणाऱ्या श्रेयाला बघून ती
उसासते. ~~नोकरी जवळ असल्याने~~ इथल्या उपनगरातून सिटीत जायला
सहज तास-दीडतास लागतोच. महानगरातल्या नोकरदारांना करावी लागणारी
यातायात, होणारी कुतरओढ. ती खिन्नपणे हसते. "आपल्या नशिबी असलं
काही नव्हतं. नोकरीचं ठिकाण जवळच असूनही करीयर दुय्यम. आणि किरकोळ
गोष्ट होती." ग्रॅज्युएट झाल्यावर 'संसाराला लागा' हा मूलमंत्र होता. ~~फार~~
लग्नाचा व्यवहार फार आटोपशीर अन् फारशा अपेक्षा नसलेला होता तेव्हा.
तिच्या मनात येतं, "जग किती झपाट्याने बदललं. श्रेयाच्या वयाच्या आपण
होतो तेव्हा श्रेया ५-६ वर्षांची होती. आणि आज त्याच वयात तिच्या
लग्नाचासुद्धा पत्ता नाहीय्. तिच्या अटी-तटी आहेतच, अन अनोळखी व्यक्ती-
शी एकदम सोयरिक कशी जमवायची यासाठी आपणच ठरवलेला पत्रिकेचा
'पण' आहे."
— आज पेपरातल्या एका जाहिरातीने स्मिताचं लक्ष वेधून
घेतलंय्. 'अचूक मार्गदर्शन — केवळ जन्मतारखेच्या आधारे' — तिचं मन

उत्साहित होते. त्यांनाच विचारायचं. त्यांचंच मार्गदर्शन घ्यायचं. "नैक्ष्यगुरूजींची पद्धत वेगळी, ह्या कुमारशास्त्रींची पद्धत वेगळी, पण मार्गदर्शन मिळलयं की." ती लगबगीने निर्णय घेऊन फोन लावते. फी चांगलीच घसघशीत घेणारआहेत ते. "पण अंकशास्त्रानुसार ते योग्य तेच सांगतील, चुकीचं नक्कीच सांगणार नाहीत" — तिचं थोडं मोठ्याने पुटपुटणं अनिलला फेकू जातंच. "म्हणजे आज कुमारशास्त्रींना लॉटरी लागणार तर". तो कुत्सितपणे हसून म्हणतो. ती त्याच्याकडे कटाक्ष टाकून आपल्या कामाकडे वळते.

—— आज श्रेया ऑफिसमधून थोडी लवकर निघालीय. निमिषला भेटण्यासाठी... काळजात काळजी, अन् विचित्र हूरहूर. आपण करतोय ते बरोबर आहे ना, याचं चमत्कारिक ओझं. तिला विलक्षण बेचैनी वाटत्येय. गेली पाच वर्ष तिच्या लग्नाचा विषय चाललाय. घरात आई-बाबांची वादावादी ती बघत्येय. कारण फक्त — तिची असंख्य ठिकाणी न जुळणारी जन्मपत्रिका. प्रत्येकवेळी मुलाचा बायोडेटा बघून मनात काही आडाखे बांधण्याच्या आतच आईने त्यावर मारलेली फुली. बाबांचा हताश चेहरा. "गेल्या पाच वर्षांत एकासुद्धा मुलाला भेटले नाहीय मी. नुसती कागदावरच्या घरांची जुळवाजुळव. कधी इतकेच गुण जुळतात म्हणून किंवा तितकेच गुण जुळत नाहीत म्हणून! कधी हा ग्रह वक्री, कधी तो वक्री. मुलाने झपाटावं तसं झपाटलंय आईला ह्या ग्रहांनी. आणखी वर "नशीबात असलेलं कोणी टाळू शकतं का?" — हा हताश दैववाद. मग अट्टाहास कशाला ह्या जुळवा-जुळवीचा? गेली पाच वर्ष हे सगळं आपल्या मनाविरूद्ध चालू आहे." आईची तळमळ आपल्या सुखमय भविष्यासाठीच आहे हे कळतंय् श्रेयाला, पण तरीही हे सर्व खूप अव्यवहारी वाटण्याजोगं, खूप वेडखाऊच.

तिची अमेरिकेतली सुमाआत्या या भारतीय पद्धतीची खिल्लीच उडवते. "कम ऑन श्रेया, अग, आपल्याला कसा नवरा किंवा बायको हवी ते ठरवण्याचा त्या व्यक्तीला अधिकार आहे. पंचवीस-तीस वर्षांच्या मुलं-मुलींची लग्नं त्यांचे आईवडील पुढाकार घेऊन ठरवतात हे मलतंच हास्यास्पद आहे. क्वाईट रिडीक्यूलस! आणि त्यात भरीस भर म्हणून पत्रिकांची पिंजोरी मॅच होतात की नाही हे बघतात आईवडील — अगदी कीस पाडतात. मग मुलं होताहेत पस्तीशी अन् चाळीशीची." — कॅलिफोर्नियातल्या आपल्या आत्याशी बोलल्यावर श्रेयाला अगदी मोकळं-मोकळं वाटलं — "अगदी मन की बात" झाल्यागत. पण सुमाआत्याची मतं आईला पटत नाहीत. सुमाआत्याच्या दोन्ही मुलांनी तिथेच सेटल झालेले इंडियन्स जोडीदार म्हणून निवडलेत 'डेटींग' करून. "अग, त्यांनी भारतीय जोडीदार निवडलेत ना, मग बाकी सात खून माफ" — आत्या खळखळून हसत बोलते.

मनमोकळं बोलणाऱ्या-हसणाऱ्या आत्याशी श्रेयाचे सूर छान जुळतात. आ
त्या कधीमधी इंडियात येते. अगदी २-४ दिवसच मुंबईत राहून सासरी जाते
भोपाळला. श्रेयाला तिची ओढ जास्त आहे — बाबांखालोखाल. त्या दोघांशी
ती छान 'रिलेट' करू शकते..

— आत्ता निमिषला भेटायला जाताना विचारांची अशी असंख्य
आंदोलनं तिच्या मनात उठतायत. तिला 'मनोमीलन' वाल्यांनी पाठवलेलं
तिला पटलेलं प्रत्येक स्थळ ती आईला दाखवते. आई नेमस्तपणे दोघांच्या
पत्रिका घेऊन गुरुजींकडे — तिकडून ~~अपराधी~~ नकारार्थी निकाल — हे सगळं
श्रेयाला पाठ झालंय. आई ~~प्रत्येक~~ अपराधी चेहऱ्याने प्रत्येक स्थळाचा लाग-
लेला 'निकाल' सांगते. भीतिदायक योग, नाड-रास-गोत्र यांची कागदावर जुंपले
ली युद्धं! ~~हे~~ ती आईचं मन जाणण्याइतकी सहृदय अन् संस्कारी आहे.
म्हणूनच ती विरोध न करता शहाण्या मुलीसारखं सगळं स्वीकारतेय.
कागदावर पटणारे-न पटणारे गुण तिला बुचकळ्यात टाकतात. वास्तवात
काही वेगळंच घडलं तर? हा प्रश्न तिला छळत राहातो. श्रेयाची आता
तिशी जवळ आलीय. लग्न, जोडीदार, मुलंबाळं हा विचार तिला खूप
सुखावह वाटतोय. तिच्या बरोबरीच्या काही मित्रांची-मैत्रिणींची लग्नं ठर-
लीयत, झालीयत. 'आता लाडू केव्हा देणार श्रेया?' हा ~~प्रश्न तिला~~
विचारला जाणारा प्रश्न तिला सुरुवातीला सुखद, पण अलीकडे वैताग
वाढवणारा वाटायला लागलाय.

— निमिषच्या बाबतीत थोडं वेगळं घडलंय. 'मनोमीलन' मधून
निमिषचा बायोडेटा बघितल्यावर तिला पटल्याचं समजल्यावर आईने लगेच
पत्रिका बघण्याची तयारी सुरू केली होती, पण नेहमीचे गुरुजी गावाला गेल्यामु
ती दुसऱ्या गुरुजींच्या शोधात आहे. आई ह्या गडबडीत असताना निमिष
चा थेट तिलाच फोन आला. आत्तापर्यंतच्या प्रथेप्रमाणे वडील माणसांनी
प्रथम एकदुसऱ्यांशी बोलण्याची रीत. अर्थात बायोडेटात मुला-मुलींचे
स्वतःचे मोबाईल नंबर असतातच. निमिषने थेट श्रेयालाच फोन लावला.
ती क्षणभर गडबडलीच. ती ऑफिसात होती. लंच ~~ब्रेक~~ मुळे सगळे
डबे खाण्यात मश्गूल. ~~निमि~~ एकदम काही सुचेनाच. पंधरवड्यासाठी इंडिया
त आलेला निमिष हे आठवत होतं. पण अजून पत्रिकेचा रिझल्ट आला
नाही, डायरेक्ट याच्याशी ~~बोलले~~ आधीच बोलले आपण तर आईला
काय वाटेल, या सगळ्या विचारांच्या कल्लोळातच निमिषशी ~~बि~~
बोलणं झालं. अगदी 'हाय श्रेया' असं म्हणून त्याने दिलखुलासपणे
~~बोलणं~~ गप्पा मारल्या श्रेयाशी. मग संध्याकाळी स्टेशनजवळच्या
'स्मायली कॉटेज' मध्ये भेटायचं ठरलं दोघांचं. त्याच्या आमंत्रणाला

होकार ~~देवून~~ देऊन फोन बंद करताना आपले तळहात घामेजलेत अन् मोबाईल पर्समध्ये टाकताना वेगळीच हुरहूर लागलीय हे जाणवलं तिला. ती ~~बाबांना~~ घरी यायला उशीर होईल असं सांगते — बाबांना फोन करून; बाबांशी बोलताना तिला कसलंच दडपण नसतं. तसा निमिषचा बायोडेटा पाहताक्षणीच फोटोसकट तिला आवडलाय. उच्चशिक्षित, ॲस्ट्रॉनॉमी — ग्रहताऱ्यांच्या ~~ख~~ खगोलशास्त्रात पी.एच्.डी. केलेला. उच्चपदस्थ भारतीय!

— हॉटेलमध्ये भेट होते ठरल्याप्रमाणे. अन् बिचकत-अवघडत सुरू झालेल्या गप्पा रंगत जाऊन रात्रीचे आठ कधी वाजतात ते दोघांनाही कळत नाही. मनं-मतं दोन्ही जुळल्यागत. ती मनमोकळेपणाने सांगते, "अरे, तू पहिलाच मुलगा आहेस ज्याला मी प्रत्यक्ष — म्हणजे 'फेस टू फेस' भेटलेय." "डोन्ट टेल मी" तो चकित होऊन म्हणतो. मग ती त्याला पत्रिका — ती मॅच होणं-न होणं ह्याविषयी सांगते. 'हं' तो विचारमग्न होऊन म्हणतो. 'पण सरप्रायझिंगली आमच्या घराण्यात तीन पिढ्या पत्रिका पाहायलीच गेली नाहीय. अगदी माझ्या पणजोबांपासून. सो, आय विल ऑल्सो कंटिन्यू द सेम ट्रॅडिशन'. — तो खळखळून हसतो. एकमेकांचा निरोप घेता-घेताच दोघांनाही आपले हृद्‌बंध जुळल्याचं जाणवतं. पुढच्या भेटीचं ठरवूनच दोघं आपापल्या वाटेने...

घरी पोहोचेपर्यंत साडेदहा होतातच. आई-बाबा दोघांची जेवणं झालेली. ~~तिला चोरट्यासारखं होतं~~. आई तिचं वाढून घेऊन टेबलावर ठेवते. ती आवरून जेवायला येते. आई आपल्यासाठी वाढून आणताना बघून तिला चोरट्यासारखं होतं. ती जेवत असताना आई तिच्या ~~पु~~ समोर बसलेली — चिंतातूर चेहऱ्याने. तिला आपल्याला काही सांगायचंय हे श्रेयाला तिच्या 'बॉडीलँग्वेज'मधून कळलंय. "आज मी कुमारशास्त्रींकडे गेले होते श्रेया" — आईच्या बोलण्यावर श्रेयाच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह. 'अगं, आपले नेहमीचे गुरुजी गावी गेलेत ना, म्हणून ह्या शास्त्रींकडे गेले होते. हे वेगळ्या पद्धतीने ज्योतिष सांगतात — जन्मतारखेवरून गं. तो निमिष आगलेचा बायोडेटा नाही का तू दाखवलास? — तो पंधरा दिवसांसाठी इंडियात आलेला मुलगा." — आई तिला कळावं म्हणून निमिषचे 'डिटेल्स' सांगतेय. श्रेयाला ठसकाच लागतो. छातीत धडधडल्यासारखं होतं. "मग? काय म्हणाले गुरुजी?" ती कापऱ्या आवाजात विचारते. "छे: अगं त्यांनीही निराशा केली बघ. तुम्हा दोघांची जन्मतारीख बघूनच लग्नानंतर संसारात 'खडाष्टक' ठरलेलं आहे, छत्तीसचा आकडा असेल असं म्हणाले ते." — आई ~~स~~ सांगण्यात अगदी रंगून गेली होती. पण श्रेयाचं हृदय अधिकच वेगाने धडधडलंय अगदी

आजच संध्याकाळी झालेली निमिषची भेट, त्याचे विचार, त्याचं व्यक्तिमत्त्व - सगळं तिच्या मनात अगदी नुकत्याच उमललेल्या फुलागत टवटवीत - ताजं! ती धीर एकवटते. 'नाऊ ऑर नेव्हर' या विचाराने. जेवण संपलंय. ती बोलते, "आई-बाबा माझा निर्णय झालाय. दोघे चमकून तिच्याकडे बघतात. "आई, सॉरी, पण मी आज निमिषलाच भेटायला गेले होते. तुला माहितीच आहे, खगोल शास्त्र - ॲस्ट्रॉलॉजीत डॉक्टरेट मिळवलीय् त्याने. अन् आजच्या आमच्या भेटीतून आम्हाला कळलंय् की आमचे विचार, मतंही जुळतायत्. कागदावरच्या ग्रह-ताऱ्यांपेक्षा प्रत्यक्षातल्या ग्रह-ताऱ्यांचा अभ्यास केलाय त्याने. त्याला पत्रिका बघण्यात म्हणूनच इंटरेस्ट नाहीय्. म्हणूनच तुला सांगते आई, नको माझ्यासाठी कष्ट घेऊस त्या ज्योतिषाकडे जाण्याचे. त्यांच्या शास्त्राचा आदर ठेवूनच मी सांगतेय् की माझा निर्णय झालाय - निमिषच्या ~~आमच्या~~ पुढील गाठीभेटीतून हा निर्णय पक्का होईल. हा विचार मात्र ठाम आहे."

"शाब्बास पोरी" — अनिलचे शब्द लेकीच्या कौतुकाने ओथंबलेले. "बेटा, त्या ग्रहांपेक्षा तुझा हा निग्रहच मला खूप महत्त्वाचा वाटतोय्. तुमचा निर्णय ठरला असेल तर मग -- गो अहेड - भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" अनिल नाटकीपणाने म्हणतो. "मी सुद्धा" — स्मिता हसत-हसत म्हणते. अगदी मनापासून! अनिल-श्रेया आश्चर्याने थक्क होऊन पाहातच राहिलेत. तिच्या व्यवहार्य होण्याच्या निग्रहाकडे!

लेखिका —
सौ. शुभा प्रमोद नाईक